# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत वऱ्हाळदेवी तलाव संवर्धन करणे कामा बाबत प्रस्तावाच्या प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

पर्यावरण विभाग मंत्रालय शासन निर्णय क्रमांक – इएमव्ही-२००८/प्र.क्र.-६९/तां.क.-३, दि.२७ ऑगस्ट २००८ अन्वये तलाव, सरोवरे आणि जलाशयाचे पर्यावरणाच्या संतुलनातील अनन्य साधारण महत्व लक्षात घेवून शासनाने तलाव संवर्धन योजना लागू केलेली आहे. या योजने अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेला शहरातील तलावाचे अनुषंगाने खालील कामे प्रस्तावित करणारा प्रकल्प अहवाल तयार करणे आहे.

१. तलावाच्या पाण्याच्या शुद्धीकरणासाठी प्रक्रिया व उपाय योजना.
२. तलावाचे कामाचे / बांधाचे मजबुतीकरण.
३. तलाव क्षेत्रात कुंपन वा संरक्षण उपाय योजना.
४. लाभ क्षेत्रातील लोकसंख्येस आवश्यकतेनुसार सुविधा पुरविणे.
५. तलावाचे लाभ क्षेत्रातील वा नजीकच्या क्षेत्रातील सांडपाणी व्यवस्थापन करणे.
६. सुशोभीकरण.
७. जनजागृती इत्यादी.

उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रथम तपशिलवार प्राथमिक स्वरुपाचा प्रस्ताव शासनास सादर करणे आहे. शासनाचे पर्यावरण विभागाने प्राथमिक प्रस्तावास मान्यता दिल्यास पुढे सविस्तर प्रकल्प अहवाल (D.P.R.) तयार करुन शासनास मंजुरी करीता सादर करणे आहे.

शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार निरनिराळ्या विकास कामांकरीता आवश्यक प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करणे, योजनेचा आराखडा व नकाशे तयार करणे, शासनाकडुन योजनेसाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करुन घेणेकामी पाठपुरावा करणे, कंत्राटदार नेमणे, निविदा तयार करणे, सुरु असलेले कामाचे संपुर्ण सुपरव्हिजन करणे, कामाची गुणवत्ता वेळोवेळी तपासून काम पुर्ण झाल्यानंतर गुणवत्ते बाबत स्टॅबिलीटी सर्टिफिकेट देणे, कंत्राटदाराने केलेल्या कामाचे देयक प्रकरणे करणे, शासनाकडे वेळोवेळी बैठकीस उपस्थित राहून सादरीकरणे करणे इत्यादी कामांचा समावेश करुन कामाकरीता अनुभवी व आवश्यक तांत्रिक अर्हता धारण असणे गरजेचे असल्याने सदर कामाकरीता मे. अजय ठाकुर ॲण्ड असोसिएटस्, औरंगाबाद यांची जा.क्र./भिनिशमनपा/पा.पु.वि./१८८/२०२३, दि.१३/०२/२०२३ रोजी अन्वये सदर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणुक करण्यांत आलेली आहे.

त्याप्रमाणे संबंधीत तांत्रिक सल्लागार मे. अजय ठाकुर ॲण्ड असोसिएटस्, औरंगाबाद यांनी सदर योजनेचे आराखडे व नकाशे तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करुन सादर केलेला आहे.

सदर राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत भिवंडी नि. श. महानगरपालिकेच्या वऱ्हाळदेवी तलाव संवर्धन करणे कामी ₹५२,९५,२१,०००/- मात्रचा प्रस्ताव तयार करण्यांत आलेला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | **राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत वऱ्हाळदेवी तलाव संवर्धन करणे कामा बाबत प्रस्तावाच्या प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत भिवंडी नि. श. महानगरपालिकेच्या वऱ्हाळदेवी तलाव संवर्धन करणे कामा बाबतचा प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** २३९ **दिनांक :** ७/०८/**२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत भिवंडी नि. श. महानगरपालिकेच्या वऱ्हाळदेवी तलाव संवर्धन करणे कामा बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत भिवंडी नि. श. महानगरपालिकेच्या वऱ्हाळदेवी तलाव संवर्धन करणे कामा बाबतचा रु.५२,९५,२१,०००/- मात्रचा अंदाजपत्रकीय प्रस्ताव शासन निर्णयानुसार महानगरपालिकेचा देय हिस्सा देणेसह शासन मान्यतेसाठी पाठविणे कामी आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यांत येत आहे तसेच पुढील कार्यवाही करणेस मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**